# कहाणी 'केसर'ची

**हापूसची कसर केसर भरून काढेल, अशी सर्वसामान्य नागरिकांना आशा होती. परंतु प्रतिकूल हवामान परिस्थितीमुळे ही आशाही मावळताना दिसते.**

यावर्षी हापूस आंब्याचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घटले आहे. बाजारात आवक खूपच कमी आहे. अक्षय्य तृतीयेनंतरही हापूसचे दर वधारून आहेत. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना हापूसचा म्हणावा तसा आस्वाद आत्तापर्यंत तरी घेता आला नाही. ही कसर हापूसनंतर येणारा केसर भरून काढेल, अशी आशा होती. परंतु ही आशाही मावळताना दिसते. यावर्षीचे सुरुवातीपासूनचे प्रतिकूल हवामान हापूस पाठोपाठ केसरच्याही मुळावर उठले आहे. सर्वसाधारणपणे केसरला १५ डिसेंबर ते १५ जानेवारी दरम्यान मोहर येतो. हा आंबा १५ मे च्या दरम्यान बाजारात येतो. त्याचवेळी गुजरातचा केसरही बाजारात दाखल होतो. शिवाय पुढे पाऊस सुरू झाला की बहुतांश जण आंबा खाणे पसंत करीत नाहीत. त्यामुळे दराच्या बाबतीत केसरला मोठा फटका बसत आला आहे. ३० ते ३५ रुपये प्रतिकिलोच्या वर केसरला दर मिळत नव्हता. केसरला लवकर मोहर येण्यासाठी राज्यातील अनेक शेतकरी आता कल्टारचा वापर करीत आहेत. कल्टारच्या वापरानंतर नोव्हेंबरमध्येच केसरला मोहर येतोय. हा केसर आंबा मार्चमध्ये काढणीला सुरुवात होऊन प्रतिकिलो १५० ते २५० रुपयांपर्यंत दर मिळतोय. एप्रिलमध्ये भरपूर आंबा निघून तो १५ मे पर्यंत संपला तर केसरला सरासरी १०० रुपये प्रतिकिलो दर मिळतो. यावर्षी मात्र निसर्गाने यात चांगलाच खोडा घातला आहे.

मागचा पावसाळा जवळपास महिनाभर लांबला. त्याचा केसरच्या मोहर प्रक्रियेवर फारसा परिणाम झाला नाही. परंतु नोव्हेंबरमध्ये सुरू होणारी थंडी बहुतांश ठिकाणी गायब होती. त्यामुळे केसरला मोहर कमी आला. त्यात मोहर धरून फळधारणा होताना काही भागात वादळी पाऊस झाला. त्यामुळे मोहर तसेच छोटी फळे गळून पडली. महत्त्वाचे म्हणजे यावर्षी नोव्हेंबर ते फेब्रुवारीपर्यंत असा थोडा थोडा केसरला मोहर येत गेला. त्यात प्रत्येक टप्प्यावर प्रतिकूल हवामान परिस्थितीने नुकसान होत गेले. फळमाशीचा प्रादुर्भावही यावर्षी केसर आंब्यावर वाढलेला दिसतो. आत्ताही केसरची काढणी सुरू असताना राज्यात (खासकरून मराठवाड्यात) गारपीट, वादळी पाऊस सुरू आहे. यातही केसरचे नुकसान वाढत आहे. यावर्षी ३० टक्केहून अधिक केसर आंबा उत्पादनात घट होण्याची शक्यता वर्तविली आहे. त्यामुळे केसरची बाजारात आवक कमी राहून दर वधारलेलेच राहणार आहेत. कोकणेतर भागात हापूसऐवजी केसरला पोषक वातावरण आहे. त्यामुळे मराठवाडा, विदर्भात केसरच्या बागा वाढत आहेत. केसरचे क्षेत्र वाढताना यात अधिक आणि दर्जेदार आंबा उत्पादनासाठी तंत्रज्ञान वापरही वाढतोय. त्यामुळे नवीन बहुतांश बागा ह्या सघन पद्धतीनेच लावल्या जात आहेत. अन्नद्रव्य, पाणी आणि कीड-रोगांचे उत्तम व्यवस्थापन उत्पादकांकडून केले जातेय. अशावेळी नोव्हेंबर ते मे या मोहर ते फळ काढणीपर्यंतच्या काळात सातत्याने बदलत असलेल्या वातावरणात उत्पादकांना योग्य तांत्रिक मार्गदर्शन झाले पाहिजेत. काढणीपश्चात सेवासुविधांतही केसर खूपच मागे आहे. हापूसप्रमाणेच राज्यातील मोठ्या शहरांमधून केसर आंबा विक्री महोत्सवाचे आयोजन पणन विभागाकडून झाले पाहिजेत. याद्वारे उत्पादक ते ग्राहक अशी साखळी मजबूत होण्यास हातभार लागेल. निर्यातीच्या बाबतीतही केसर थोडा दुर्लक्षितच म्हणावा लागेल. आखाती देशांबरोबर युरोपियन देश, अमेरिका तसेच आपल्या शेजारील राष्ट्रांतही केसरची निर्यात वाढायला हवी. याकरिता उत्पादक, कृषी-पणन विभाग, अपेडा तसेच केंद्र-राज्य शासनाने प्रयत्न वाढवायला हवेत. केसर आंबा उत्पादक गट-समूह यांनी देखील आपली निर्यात कशी वाढेल, हे पाहायला हवे. कॅनिंगसाठी हापूस बऱ्यापैकी जातो, येथेही केसरची पिछाडी दिसून येते. केसरवरील प्रक्रिया उद्योगही वाढायला हवेत. असे झाले तर केसरची गोडी वाढेल.

Agrowon Dt.26/04/2023

# कांदा अनुदानासाठी अर्जांना ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ

## हजारो शेतकरी अर्ज करणे बाकी; आठ दिवसांचा दिलासा

**ॲग्रोवन वृत्तसेवा**

नाशिक : १ फेब्रुवारी ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत कृषी उत्पन्न बाजार समिती, खासगी बाजार, थेट पणन अनुज्ञप्ती धारकाकडे अथवा 'नाफेड'च्या खरेदी केंद्रात कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना अनुदान देण्याबाबत राज्य सरकारने निर्णय घेतला आहे. यासाठी अर्ज करण्याची मुदत ३ ते २० एप्रिल होती. मात्र हजारो शेतकरी अर्ज करणे बाकी असल्याने पणन संचालनालयाने अर्ज करण्यास ३० एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली आहे. याबाबत पणन उपसंचालक मोहन निंबाळकर यांच्या स्वाक्षरीने पत्रक काढण्यात आले आहे.

फेब्रुवारी २०२३ च्या सुरूवातीपासून लेट खरीप कांद्याच्या दरातील घसरण आणि विविध शेतकरी संघटना आणि शेतकऱ्यांकडून होणारी अनुदानाची मागणी लक्षात घेता ''कांदा बाजारभावतील घसरण व उपाययोजना''अंतर्गत कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना ३५० रुपये प्रतिक्विंटल व जास्तीतजास्त २०० क्विंटल प्रतिशेतकरी या प्रमाणे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. हे अनुदान मिळविण्यासाठी अर्ज करण्याची मुदत ३ ते २० एप्रिल होती. मात्र अनेक शेतकरी कांदा अनुदान मिळण्यासाठी अर्ज करण्याचे बाकी राहिले आहेत. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी, बाजार समितीचे पदाधिकारी यांच्याकडून अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात आली होती. पणन संचालनालयाच्या निर्दशनास ही बाब आल्याने हा निर्णय घेण्यात आला.



### 'वाढीव मुदतीची सूचना द्या'

मुदतवाढीबाबत 'पणन'तर्फे याबाबत मुंबई वगळता जिल्ह्यातील सर्व सहकारी संस्थांच्या जिल्हा उपनिबंधकांना पत्र लिहिण्यात आले आहे. वाढीव मुदतीबाबतची सूचना जिल्ह्यातील सर्व बाजार समिती, खासगी बाजार, थेट पणन अनुज्ञप्ती धारक व नाफेड खरेदी केंद्रांना द्यावी, असे निंबाळकर यांनी कळविले आहे.

Agrowon Dt.22/04/2023

# पुणे बाजार समितीकडून शेतकऱ्यांसाठी सुविधा

पुणे, दि. १६ (प्रतिनिधी) – पुणे बाजार समितीत कांदा अनुदानाचे अर्ज भरण्यासाठी येणाऱ्या शेतकऱ्यांना कार्यालयाबाहेर दारात बसून कांदा अर्ज भरावे लागत होते. राज्याच्या पणन संचालकांनी शेतकऱ्यांना पिण्यासाठी पाणी, टेबल-खुर्च्यांची व्यवस्था करण्याचे आदेश राज्यातील सर्व बाजार समित्यांना दिल्यानंतर पुणे बाजार समितीने शेतकऱ्यांसाठी टेबल, खुर्च्यांची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

कांद्याचे दर घसरल्याने अडचणीत आलेल्या राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना राज्य सरकारने २०२२-२०२३ या वर्षात विक्री केलेल्या कांद्याला अनुदान जाहीर केले आहे. राज्यातील कृषी



उत्पन्न बाजार समित्यांमध्ये खासगी बाजारमध्ये, थेट पणन अनुज्ञप्तीधारकांकडे अथवा नाफेडकडे १ फेब्रुवारी २०२३ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीमध्ये कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल ३५० रुपये व जास्तीत जास्त २०० क्विंटलच्या मर्यादेत प्रतिशेतकरी असे अनुदान मंजूर केले आहे. शेतकऱ्यांना अनुदानासाठी अर्ज करण्यासाठी २० एप्रिल ही शेवटची मुदत आहे. कांदा अनुदानाचे अर्ज भरण्यासाठी मार्केटयार्डात येणाऱ्या शेतकऱ्यांना बसण्यासाठी, पिण्याच्या पाण्याची आदी कोणत्याही सुविधा बाजार समितीने उपलब्ध केल्या नव्हत्या. हा प्रकार दै. 'सामना'ने समोर आणल्यानंतर राज्याचे पणन संचालक विनायक कोकरे यांनी कांदा अनुदान अर्ज भरण्यासाठी येणाऱ्या शेतकऱ्यांसाठी पिण्याचे पाणी, बसण्यासाठी टेबल, खुर्च्या आदी सुविधा उपलब्ध करून देण्याचे आदेश संबंधित सर्व बाजार समित्यांना दिले. त्यानुसार रविवारी बाजार समितीने सुविधा उपलब्ध करून देण्यास सुरुवात केली.

Samana Dt.17042023

# जपान, अमेरिकेला आंबा रवाना

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य कृषी पणन मंडळाच्या नवी मुंबईतील वाशी येथील निर्यात सुविधा केंद्रामधील व्हेपर हीट ट्रीटमेंट सुविधेच्या वापरातून शनिवारी (दि. ८) अकराशे किलो केशर व बैगनपल्ली जातीचे आंबे जपानला निर्यात करण्यात आले. तसेच, मंगळवारी (दि. ११) अमेरिकेला येथील विकिरण सुविधेच्या वापरातून हापूस, केशर व बैगनपल्ली जातीच्या आंब्यांची मिळून साडेसहा मेट्रिक टन इतकी यंदाच्या हंगामात हवाई वाहतुकीद्वारे निर्यात करण्यात आली आहे.



आंबा निर्यातीस हिरवा झेंडा दाखविताना दीपक शिंदे, डॉ. भास्कर पाटील, आंबा निर्यातदार व अधिकारीवर्ग.

अमेरिकेकरिता आंब्यांच्या निर्यातीस पणन मंडळाचे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये सुरुवात झाली. या वेळी अमेरिकेचे निरीक्षक एलिफ्रिडो मारीन (फ्रेडी), केंद्राच्या राष्ट्रीय वनस्पती संरक्षण संस्थेचे (एन.पी.पी.ओ.) अधिकारी डॉ. वेंकट रेड्डी, अपेडाच्या प्रणिता चौरे व निर्यातदारांचे प्रतिनिधी, पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. भास्कर पाटील व अन्य अधिकारी या वेळी उपस्थित होते. जपान, न्यूझीलंड, दक्षिण कोरिया, युरोपियन देश तसेच रशिया या देशांच्या निकषान्वये आंब्यावर व्हेपर हीट ट्रीटमेंट प्रक्रिया करणे बंधनकारक आहे. उत्पादकांना चांगले दर मिळण्यास मदत होत असल्याची माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांनी दिली.

**निर्यातीत हापूस, केशर, बैगनपल्ली आंब्यांचा समावेश**

## विकिरणाद्वारे आंब्यामधील कोयकिडा व कीटकांचे निर्मूलन

अमेरिका, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, अर्जेंटिना या आयातदार देशांच्या निकषान्वये निर्यातीपूर्वी आंब्यामधील कोयकिडा व कीटकांचे निर्मूलन करण्याकरिता विकिरण प्रक्रिया बंधनकारक आहे. आंब्यांवरील विकिरण सुविधेत कोबाल्ट-६० किरणांचा वापर केला जातो. विकिरण प्रक्रिया उष्णता व रसायनविरहित प्रक्रिया असल्याने अन्नपदार्थांच्या मूळ गुणधर्मामध्ये कोणतेही बदल होत नाहीत. सुविधेवर विकिरण प्रक्रिया करताना अमेरिकेचे निरीक्षक प्रत्यक्ष उपस्थित असतात.

Pudhari dt. 17/04/2023

# अमेरिका, जपानला आंबा निर्यात सुरू

## हापूस, केसर, बैंगनपल्लीचा समावेश

ॲग्रोवन वृत्तसेवा



पुणे : महाराष्ट्रासह कर्नाटक राज्यात उत्पादित होणाऱ्या आंब्याला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळावी यासाठी राज्य कृषी पणन मंडळाच्या वतीने कृषी हवामान विभागनिहाय निर्यात सुविधा केंद्रे सुरू केली आहेत. त्यामधील वाशी (नवी मुंबई) येथील निर्यात सुविधा केंद्रांतून जपान आणि अमेरिकेला हापूस, केसर आणि बैंगनपल्ली आंब्याची पहिली कन्साईनमेंट पाठविण्यात आल्याची माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांनी दिली.

वाशी येथील निर्यात सुविधा केंद्रामध्ये विविध देशांसाठीचे विविध निर्यात प्रोटोकॉल तयार करण्यात आले आहेत. यामध्ये उष्णजल आणि विकिरण सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामध्ये विकिरण सुविधा ही भाभा अणुऊर्जा केंद्राद्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहे. उष्णजल सुविधा प्रक्रियेद्वारे ८ एप्रिल रोजी केसर व बैंगनपल्ली हा सुमारे १ टन आंबा जपानला निर्यात करण्यात आला. तर ११ एप्रिल रोजी साडेसहा टन हापूस, केसर व बैंगनपल्लीची पहिली कन्साईनमेंट अमेरिका येथे निर्यात करण्यात आली.

जपान, न्युझीलंड, दक्षिण कोरिया, युरोपीयन देश तसेच रशिया या आयातदार देशांच्या निकषान्वये निर्यातीपूर्वी आंब्यावर उष्णजल प्रक्रिया करणे बंधनकारक आहे. याद्वारे फळमाशी (फ्रूट फ्लायचा) चा होणारा प्रादुर्भाव नष्ट केला जातो. तर अमेरिका, ऑस्ट्रेलिया, मलेशिया, अर्जेंटिना या आयातदार देशांच्या निकषान्वये निर्यातीपूर्वी आंब्यामधील कोयकिडा व कीटकांचे निर्मूलन करण्याकरिता विकिरण प्रक्रिया केली जाते. या सुविधेवर कोबाल्ट-६० किरणांचा विकीरणासाठी वापर केला जातो. प्रक्रिया उष्णता व रसायनविरहीत असल्याने अन्नपदार्थांच्या मूळ गुणधर्मामध्ये बदल होत नसल्याचे शिंदे यांनी सांगितले.

अमेरिकेच्या आंब्याची पहिली कन्साईनमेंट दीपक शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत रवाना झाली. या वेळी अमेरिकेचे निरीक्षक एलीफ्रिडो मारिन (फ्रेडी), 'एनपीपीओ'चे प्लँट प्रोटेक्शन ऑफिसर डॉ. वेंकट रेड्डी, 'अपेडा'च्या श्रीमती प्रणिता चौरे व निर्यातदारांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

### लवकरच समुद्रमार्गे अमेरिकेला निर्यात

गेल्यावर्षी अमेरिकेला समुद्रामार्गे आंबा निर्यात यशस्वीपणे प्रायोगिक तत्त्वावर करण्यात आली होती. यामुळे या हंगामात (२०२३) देखील व्यावसायिकदृष्ट्या आंबा निर्यात समुद्रमार्गे करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. पणन मंडळाच्या आंबाविषयक सर्व सुविधा संगणक प्रणालीद्वारे मॅगोनेटमध्ये नोंदणीकृत शेतकऱ्यांसमवेत व पॅकहाऊससमवेत लिंकिंग झालेल्या आहेत. यामुळे आयातदारास आंब्याच्या गुणवत्तेबाबत खात्री मिळत असून निर्यातवृद्धीस मदत होत आहे. या कन्साईनमेंटकरिता 'अपेडा', 'एनपीपीओ'च्या सहकार्याने कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. भास्कर पाटील यांच्यासह इतर अधिकाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले.

Agrowon Dt. 14/04/2023

# अमेरिका व जपानला आंब्याच्या निर्यातीला सुरुवात

**पुणे : प्रतिनिधी**

राज्यात उत्पादित होणाऱ्या आंब्याला विकसित देशांची बाजारपेठ उपलब्ध होण्याकरिता आवश्यक असलेल्या सर्व सोयीसुविधा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाने उपलब्ध करून दिल्या आहेत. या हंगामातील आंब्याची जपानची पहिली कन्साइनमेंट महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या वाशी, नवी मुंबई येथील व्हेपर हीट ट्रिटमेंट सुविधेवरून रवाना करण्यात आली आहे.



यामध्ये केशर व बैगनपल्ली असा एकूण १.१ मे. टन आंबा मे. जयश्री एक्पोर्ट यांच्या माध्यमातून जपान येथे निर्यात करण्यात आला. जपान या आयातदार देशाच्या निकषान्वये निर्यातपूर्वी आंब्यावर व्हेपर हीट ट्रिटमेंट प्रक्रिया करणे बंधनकारक आहे. कृषी पणन मंडळाच्या अद्ययावत अशा व्हेपर हीट ट्रिटमेंट सुविधेमुळे हे शक्य झाले आहे. जपानची बाजारपेठ इतर देशांच्या तुलनेने वेगळी असण्याचे महत्त्वाचे कारण आहे की, जपानमध्ये आपला आंबा केवळ भारतीयच नाही तर जपानिज ग्राहकदेखील आवडीने खातात, अशी माहिती कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांनी दिली.

सन २०१९ पर्यंत जपानीज निरीक्षकाच्या प्रत्यक्ष उपस्थितीमध्ये व्हेपर हीट ट्रीटमेंट प्रक्रिया करून प्रक्रिया प्रमाणित केल्यानंतरच आंब्याची जपानला निर्यात होत होती. हंगाम २०२० व २०२१ मध्ये कोविड-१९ रोगाच्या प्रादुर्भावामुळे जपान देशाचे इन्स्पेक्टर भारतात येऊ शकले नाहीत. आंबा हंगाम-२०२२ पासून जपानने त्यांचे निरीक्षक न पाठविता केंद्र शासनाच्या एन.पी.पी.ओ. विभागाच्या निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली सर्व प्रक्रिया करून, प्रक्रियेचे प्रमाणीकरण करून आंबा आयातीस जपानने परवानगी दिली आहे, असे शिंदे यांनी सांगितले. कृषी पणन मंडळाच्या वाशी, नवी मुंबई येथील विकीरण सुविधा केंद्रावरून ६.५ मे. टन हापूस, केशर व बैगनपल्ली या आंब्याची पहिली कन्साइनमेंट अमेरिका येथे निर्यात करण्यात आली. आंब्यामधील कोयकिडा व किटकांचे निर्मूलन करण्याकरिता अमेरिका येथे आंबा निर्यातीपूर्वी विकीरण प्रक्रिया बंधनकारक आहे.

## शेतकऱ्याला मिळतोय चांगला दर

पणन मंडळाच्या आंबाविषयक सर्व सुविधा संगणक प्रणालीद्वारे मॅगोनेटमध्ये नोंदणीकृत शेतकऱ्यांसमवेत व पॅकहाऊससमवेत लिंकिंग झालेल्या आहेत. यामुळे आयातदारास आंब्याच्या गुणवत्तेबाबत खात्री मिळत असून, निर्यातवृद्धीस मदत होत आहे. मॅगोनेटमुळे बहुतांश शेतकऱ्यांचा माल त्यांच्या शेतावरूनच निर्यातदार खरेदी करतात व पर्यायाने शेतकऱ्याला चांगला दर प्राप्त होण्यास मदत होत आहे. सदर कन्साइनमेंटकरिता अपेडा, एन.पी.पी.ओ. यांचे सहकार्याने कृषी पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक डॉ. भास्कर पाटील व इतर अधिकाऱ्यांनी विशेष प्रयत्न केले.

Punyanagari Dt. 13/04/2023

# अमेरिका, जपानला आंब्याची निर्यात

## कृषी पणन मंडळाच्या निर्यात सुविधेवरून सुरुवात

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्याच्या पणन संचालनालयांतर्गत असलेल्या पणन मंडळाच्या वाशी येथील निर्यात सुविधा केंद्रावर जपान आणि अमेरिका येथे सुमारे साडेसात टन आंब्याची निर्यात करण्यात आली. हापूस तसेच केशर, बैंगनपल्ली या जातीच्या आंब्यांची हंगामातील पहिली निर्यात करण्यास मंडळास यश आले आहे.

राज्यात उत्पादन केल्या जाणाऱ्या आंब्यांच्या निर्यातीसाठी राज्य पणन मंडळाने सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. हंगामातील आंब्याची जपानला पहिली कन्साइन्मेंट वाशी येथील 'व्हेपर हीट ट्रीटमेंट' सुविधेवरून रवाना करण्यात आली आहे. केशर आणि बैंगनपल्ली आंब्याचे १.१ टन आंबा निर्यात करण्यात आला. आंब्यामधील कोयकिडा व किटकांचे निर्मूलनासाठी अमेरिकेत आंबा निर्यातीपूर्वी विकिरण प्रक्रिया बंधनकारक आहे. विकिरण सुविधा केंद्रावर साडेसहा टन हापूस केशर, बैंगनपल्ली आंब्याची पहिली खेप अमेरिकेत निर्यात करण्यात आली, अशी माहिती राज्य पणन मंडळाचे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांनी दिली.

### व्हेपर हीट ट्रीटमेंट म्हणजे काय?

- आंब्यावर होणाऱ्या फळमाशीचा प्रादुर्भाव नष्ट होण्यासाठी 'व्हेपर हीट ट्रिटमेंट' प्रक्रिया करावी लागते.
- या प्रक्रियेत निर्यात केंद्रावर आलेल्या आंब्याचे ग्रेडिंग केले जाते. त्यानंतर तो आंब्याच्या क्रेट्स मशिनमध्ये ठेवल्या जातात.
- त्यानंतर टप्प्याटप्प्याने आंब्याच्या गराचे तापमान वाढवून ४७.५ अंश सेल्सिअस तापमान नियंत्रित केले जाते. त्या तापमानाला आंबा २० मिनिटे ठेवला जातो.

Maha. Times Dt. 13/04/2023

# कांदा अनुदानासाठी बाजार समित्यांकडे अर्ज करा

**पुणे** : राज्य सरकारने शेतकऱ्यांना प्रति क्विंटल ३५० रूपयांप्रमाणे जास्तीतजास्त २०० क्विंटलपर्यंत प्रति शेतकरी अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यात संबंधित बाजार समित्यांमध्ये लाल कांद्याची विक्री केलेल्या शेतकऱ्यांनी २० एप्रिलपूर्वी अर्ज करण्याचे आवाहन पुणे जिल्हा उपनिबंधक (ग्रामीण) प्रकाश जगताप यांनी केले आहे.

कृषी उत्पन्न बाजार समित्या, खाजगी, बाजार, थेट पणन अनुज्ञप्तीधारक व नाफेड केंद्राकडे १ फेब्रुवारी २०२३ ते ३१ मार्च २०२३ या कालावधीत लाल कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना मंजूर अनुदान दिले जाणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

शेतकऱ्यांनी संबंधित विक्री केलेल्या ठिकाणी अथवा बाजार समित्यांकडे अर्ज सादर करताना अर्जासोबत कांदा विक्रीपट्टीची मूळ प्रत कांदा पीक पेरा नोंद असलेल्या सातबारा उतारा अर्जासोबत कांदा विक्री पट्टीची मूळ प्रत कांदा पीक पेरा नोंद असलेल्या सातबारा उतारा, तसेच राष्ट्रीयीकृत बँक, जिल्हा सहकारी बँक, खाजगी बँक, जिल्हा सहकारी बँक आदींच्या जमा बँकेत शेतकऱ्यांनी खाते उघडले आहे. त्या बँकेच्या पासबुकची पहिल्या पानाची छायांकित प्रत (आयएफएस कोड व अकाउंट नंबर) जोडावयाची आहे.

शेतकऱ्यांना कांदा अनुदान अर्जाचा नमुना कृषी उत्पन्न बाजार समिती, खाजगी बाजार, थेट पणन परवानाधारक व नाफेड खरेदी केंद्रावर सर्व शेतकऱ्यांना निशुल्क उपलब्ध आहे. तसेच शेतकऱ्यांस साध्या कागदांवर देखील द्यावयाची माहिती ही संबंधित कागदपत्रे जोडून देता येईल, असेही त्यांनी म्हटले आहे.

Kesari Dt. 13/04/2023

# 'ई-नाम'ने कोष खरेदी करणारा पुणे पहिला जिल्हा

पुढारी ANCHOR

## बारामती येथे ई-नाम पध्दतीने कोषांची खरेदी सुरू

> कृषी उत्पन्न बाजार समिती, बारामती येथे रेशीम कोष बाजारपेठ तथा कोषपश्चात प्रक्रिया उद्योगास चालना मिळावी तसेच चांगले रीलर्स व विव्हर्स तयार व्हावेत या उद्देशाने 'रेशीम विकास कार्यक्रम पायाभूत सुविधा निर्मिती व अस्तित्वातील बळकटीकरण करण्यासाठी योजना' अंतर्गत शासनाने ९ कोटी ५६लाख ६२ हजार रुपये मंजूर केले आहेत.
>
> - **संजय फुले**, जिल्हा रेशीम विकास अधिकारी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

जिल्ह्यात २०२२-२३ या वर्षात तुती लागवडीसाठी देण्यात आलेल्या २५० एकर उद्दिष्टापैकी २४१ एकर क्षेत्रावर २२६ शेतकऱ्यांनी तुतीची लागवड केली आहे. चालू वर्षात ३ लाख ९ हजार ४०० अंडीपुंजांच्या कीटक संगोपनापासून २ लाख १८ हजार ४१४ किलोग्राम कोषांचे उत्पादन झाले आहे. मागील वर्षाच्या तुलनेत अंडीपुंजांची संख्या ३३ हजार ८२५ संख्येने जास्त असून कोष उत्पादन ४० हजार ५९९ किलोग्रामने वाढले असल्याची माहिती जिल्हा रेशीम विकास अधिकारी संजय फुले यांनी दिली आहे. दरम्यान ई-नाम पद्धतीने कोषांची खरेदी करणारा पुणे हा राज्यातील पहिलाच जिल्हा ठरला आहे.

त्यातही राज्यात पहिल्यांदाच कृषी उत्पन्न बाजार समिती, बारामती येथे कृषी उत्पन्न बाजार समिती व रेशीम संचालनालय यांच्या समन्वयाने ई-नाम पद्धतीने कोषांची खरेदी करण्यास सुरुवात झाली. जिल्ह्यात जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत अंडीपुंजांच्या अनुदानापोटी १३ लाख ३३ हजार ९१३ रुपये मंजूर झाले असून, लाभार्थ्यांना रक्कम वाटपाची प्रक्रिया सुरू झाली आहे. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत जिल्ह्यात १७५ अल्पभूधाक शेतकऱ्यांना लाभ देण्यात आला आहे. ही योजना ३ वर्षांच्या कालावधीसाठी असून, विभागून एकरी ३ लाख ४२ हजार ९०० रुपये अनुदान देण्यात येते.

जिल्हा वार्षिक योजनेतून नावीन्यपूर्ण योजनेंतर्गत कृषी उत्पन्न बाजार समिती, बारामती येथे शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने रॉ सिल्क सेंटरसाठी ५ लाख ३९ हजार रुपयांचा निधी मिळाला असून, त्यातून यंत्र उभारणीचे काम प्रगतीपथावर आहे.

खेड तालुक्यातील मौजे दौंदे येथे खासगी स्तरावर बालकिटक संगोपन केंद्र (चॉकी) असून, त्या माध्यमातून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना २ अवस्था पूर्ण झालेल्या रेशीम किटकांचा (अळ्यांचा) पुरवठा केला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कोष उत्पादनात वाढ झाली आहे. पुणे जिल्ह्यात चालू वर्षी १ लाख ६७ हजार २०० अंडीपुजांची चॉकी वाटप करण्यात आली आहे.

रेशीम शेती उद्योगामध्ये कोषापासून वस्त्रनिर्मितीपर्यंत आर्थिक लाभ मिळतोच; परंतु याशिवाय तुतीच्या पाल्यापासून ग्रीन टी तयार केला जातो. तो मधुमेह आणि उच्च रक्तदाब नियंत्रणात गुणकारी ठरत आहे, प्युपापासून (सुरवंटापासून) मत्स्यखाद्य व तेलाची निर्मिती होते. तसेच तुतीच्या फळांपासून उच्च दर्जाची वाईननिर्मितीही केली जाते. याशिवाय अलीकडच्या काळात रेशीममध्ये असणा-या सेरीसिन या रसायनांपासून विविध औषधांची निर्मितीही केली जाते.

Punayanagari Dt. 12/04/2023

# ‘ई-नाम’द्वारे राज्यात ‘इंटरस्टेट, इंटरमंडी ई-ट्रेड’ची सुरुवात

## ‘पणन’चे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांची माहिती

ॲग्रोवन वृत्तसेवा

पुणे : ‘‘केंद्र शासनाच्या ई-नाम योजनेअंतर्गत देशातील बाजार समित्यांशी राज्यातील ११८ बाजार समित्या जोडल्या आहेत. राज्यात आता ‘इंटरस्टेट व इंटरमंडी ई-ट्रेड’ची सुरुवात करण्यात आली आहे,’’ अशी माहिती राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांनी दिली. यामुळे शेतकऱ्यांना आता केवळ स्थानिक बाजार समितीवर अवलंबून राहण्याची गरज राहिलेली नाही. विविध आंतरराज्य पर्याय उपलब्ध झाल्याने शेतीमाल खरेदी-विक्रीतील स्पर्धा वाढणार आहे.

शिंदे म्हणाले,‘‘ई-नाम अंतर्गत या बाजार समित्यांमध्ये १ हजार ९९४ कोटी रुपये किमतीच्या एकूण ५१३ लाख क्विंटल शेतीमालाची ई-लिलावाद्वारे विक्री झाली आहे. बाजार समिती अंतर्गत ई-लिलावाद्वारे व्यवहार (इंट्रामंडी), राज्यांतर्गत दोन बाजार समित्यांमध्ये ई-लिलावाद्वारे व्यवहार (इंटरमंडी) आणि दोन राज्यातील बाजार समित्यांमध्ये ई-लिलावाद्वारे व्यवहार (इंटरस्टेट) अशा तीन स्तरांत ई-नामची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

ऑक्टोबर २०२२ मध्ये ई-नाम अंतर्गत प्रथमच दोन राज्यांतील बाजार समित्यांमध्ये (इंटरस्टेट) शेतीमालाची ई-लिलावाद्वारे खरेदी-विक्री व्यवहार सुरू करीत ई-नामची तिसऱ्या स्तरावरील अंमलबजावणी सुरू झाली. बारामती बाजार समितीने रेशीम संचालनालय, नागपूर यांच्या मान्यतेने मुख्य यार्ड येथे रेशीम कोश खरेदी-विक्रीसाठी केंद्र सुरू केले आहे. रेशीम कोषसाठी देशातील पहिला ई-लिलाव बारामती बाजार समितीमध्ये यशस्वी झाला.

सद्यःस्थितीत ‘ई-नाम इंटरस्टेट’द्वारे रेशीम कोष, कापूस, कांदा, मूग व ओव्याची एकूण ३५२ क्विंटल व ६७ लाख रुपयांची विक्री केरळ, मध्य प्रदेश, झारखंड, राजस्थान व गुजरात या राज्यात करण्यात आली आहे.’

### १२६० बाजार समित्या ‘ई-नाम’मध्ये

देशातील १ हजार २६० बाजार समित्या ई-नामला जोडल्या आहेत. राज्यातील ११८ बाजार समित्या ई-नामला जोडल्या आहेत. त्यातील पहिला स्तर पूर्ण झाला आहे. आतापर्यंत ई-नामद्वारे सोयाबीन, हरभरा, मका, गहू, ज्वारी, हळद, तूर व उडीद या शेतीमालाची विक्री झाली आहे.

### महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर

शेतीमालाच्या गुणवत्ता तपासणीअंतर्गत १२ लाख ९७ हजार लॉट्सची तपासणी झाली. ई-नाम अंतर्गत ३१० कोटी ५९ लाखांची रक्कम शेतकऱ्याच्या खात्यात ऑनलाइन जमा झाली. ई-नाम अंतर्गत ई-पेमेंट करणारे महाराष्ट्र हे देशातील तिसऱ्या क्रमांकाचे राज्य ठरले आहे.

Agrowon Dt. 12/04/2023

# राज्यात होणार बाजार समित्यांचे विभाजन, काहींचे विलीनीकरण

## शासनाने अचानक घेतलेल्या निर्णयामुळे गोंधळात वाढ

**विनोद इंगोले : ॲग्रोवन वृत्तसेवा**

नागपूर : राज्यातील बाजार समित्यांच्या निवडणुका ३० एप्रिलपर्यंत घेण्याचे न्यायालयाचे निर्देश आहेत. मात्र राज्य शासनाने अचानक काही बाजार समित्यांचे विभाजन तर काही समित्यांचे विलीनीकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या बाजार समिती हद्दीतील निवडणुकांचे काय होणार? याबाबत संभ्रमावस्था निर्माण झाली आहे.

राज्यातील बाजार समित्यांच्या निवडणुका गेल्या अनेक वर्ष या- ना त्या कारणामुळे रखडल्या होत्या. या विरोधात काही पदाधिकाऱ्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्याची दखल घेत न्यायालयाने राज्यातील बाजार समित्यांच्या निवडणुका ३० एप्रिलपर्यंत घेण्याचे निर्देश दिले. त्यानुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाने निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. २८ आणि ३० एप्रिल अशा दोन टप्प्यात निवडणुका होणार आहेत.

दरम्यान, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या संचालक मंडळाची १४९ वी बैठक मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत मंत्रालयात झाली. त्यात राज्यातील काही बाजार समितीचे विभाजन तर काहींचे विलीनीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला. परिणामी, या बाजार समित्यांमधील संचालक मंडळाच्या निवडणुका स्थगित कराव्यात, अशी विनंती 'पणन'चे सहसचिव सुग्रीव धपाटे यांनी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला केली आहे. विलीनीकरण आणि विभाजनाची प्रक्रिया जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) यांच्या स्तरावर होईल. या बाजार समितीच्या निवडणुका स्थगित कराव्यात, असे पत्रात म्हटले आहे. विभाजन व विलिनीकरणाच्या कायदेशीर प्रक्रियेनंतर तेथील संचालक मंडळाच्या निवडणुका नियमाप्रमाणे यथावकाश घ्याव्यात, असेही नमूद आहे. वर्धा जिल्ह्यातील आष्टी बाजार समितीचा निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला होता. या समिती अंतर्गत कारंजा घाडगे हा उपबाजार आहे. या समितीसाठी ६१ अर्ज दाखल झाले. त्यातील दोन अर्ज छाननीत बाद झाले. सध्या ५९ उमेदवार रिंगणात आहेत.

### ...अशी होणार कार्यवाही

- खुलताबाद (छत्रपती संभाजीनगर) बाजार समितीचे लासूर स्टेशन बाजार समितीमध्ये विलीनीकरण.
- कुंटूर (नांदेड) बाजार समितीचे नायगाव (बा) बाजार समितीमध्ये विलीनीकरण.
- बोदवड (जळगाव) बाजार समितीचा उपबाजार वरणगावचा समावेश भुसावळ बाजार समितीत करणे.
- आष्टी (वर्धा) बाजार समितीचे विभाजन करून कारंजा घाडगे येथे स्वतंत्र बाजार समितीची स्थापना करणे.

**“ शासनाने राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण (पुणे) यांना पत्राद्वारे आष्टी बाजा समिती विभाजनाच्या पार्श्वभूमीवर निवडणुका स्थगितीची विनंती केली आहे. अद्याप त्या संदर्भातील कोणत्याही सूचना प्राप्त नाहीत. त्यामुळे नियमानुसार निवडणुकीचा कार्यक्रम राबविला जात आहे.**

**– प्रकाश भजाणी,** जिल्हा उपनिबंधक, वर्धा.

**बाजार समितीस्तरावर अद्याप कोणतेही पत्र प्राप्त झालेले नाही. त्यासोबतच निवडणुकीची प्रक्रिया उपनिबंधकस्तरावर राबवली जाते. त्यामुळे याबाबतचे सर्व निर्णय घेण्याचे अधिका उपनिबंधकांना आहेत.**

**– नंदकुमार वरकड,** सचिव, बाजार समिती, आष्टी, जि. वर्धा.

Agrowon Dt. 09/04/2023

# बारामतीच्या रेशीम कोशची केरळमध्ये ऑनलाइन विक्री

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** केंद्र सरकारच्या ई-नाम योजनेंतर्गत देशातील बाजार समित्यांशी राज्यातील ११८ बाजार समित्या जोडल्या असून, राज्यात इंटरस्टेट व इंटरमंडी ई-ट्रेडची सुरुवात करण्यात आली आहे. त्यानुसार या बाजार समित्यांमध्ये १ हजार ९९४ कोटी रुपये किमतीच्या ५१३ लाख क्विंटल शेतमालाचा समावेश आहे. या शेतमालाची ई-लिलावाद्वारे विक्री झाली आहे.

ई-नाममध्ये बाजार समितीअंतर्गत (इंट्रामंडी), राज्यातीलच दोन बाजार समित्यांमध्ये (इंटरमंडी) आणि दोन राज्यांतील बाजार समित्यांमध्ये ई-लिलावाद्वारे व्यवहार (इंटरस्टेट) अशा तीन स्तरामध्ये ई-नामची अंमलबजावणी करण्यात येत आहे. यात देशातील १ हजार २६० बाजार समित्या जोडल्या असून, राज्यातील ११८ बाजार समित्या ई-नामला जोडल्या आहेत. आतापर्यंत ई-नामद्वारे सोयाबीन, हरभरा, मका, गहू, ज्वारी, हळद, तूर व उडीद या शेतमालांची विक्री केली आहे.

दोन बाजार समित्यांमध्ये आतापर्यंत १ लाख ६७२ क्विंटल व ५४ कोटी ६१ लाख किमतीचे इंटरमंडी व्यवहार झाले आहेत.

> ई-नाम अंतर्गत ३९० कोटी ५९ लाखांची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात ऑनलाइन अदा करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत ई-नाम अंतर्गत ई-पेमेंट करणारे महाराष्ट्र हे देशातील तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे.
>
> \- दीपक शिंदे, कार्यकारी संचालक, कृषी पणन मंडळ

## रेशीम कोश, कापूस, कांदा व ओव्याची विक्री

ऑक्टोबरमध्ये दोन राज्यांतील बाजार समित्यांमध्ये (इंटरस्टेट) शेतमालाचा ई-लिलावाद्वारे खरेदी-विक्री व्यवहार सुरू झाला आहे. बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीने रेशीम कोश खरेदी-विक्रीसाठी केंद्र सुरू केले आहे. केरळ येथील व्यापाऱ्यांद्वारे या रेशीम कोशाची खरेदी होत आहे. तर नाशिक जिल्ह्यातील शेतकरी झारखंडमध्ये कांद्याची विक्री करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना शेतमालाची रक्कम ई-नामद्वारे ऑनलाइन देण्यात येत आहे. सद्य:स्थितीत रेशीम कोश, कापूस, कांदा, मूग व ओवा या शेतमालांची एकूण ३५२ क्विंटल व ६७ लाख रुपये किमतीची विक्री केरळ, मध्य प्रदेश, झारखंड, राजस्थान व गुजरात या राज्यांत करण्यात आली आहे.

Lokmat Dt. 08/04/2023

# ई-नामद्वारे राज्यात इंटरस्टेट व इंटरमंडी ई-ट्रेडची सुरुवात

## संचालक दीपक शिंदे यांची माहिती

## ई-नाम अंतर्गत ५१३ लाख क्विंटल शेतमालाची ई-लिलावाद्वारे विक्री

**। पुणे : प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या ई-नाम योजनेअंतर्गत देशातील बाजार समित्यांशी राज्यातील ११८ बाजार समित्या जोडल्या असून राज्यात इंटरस्टेट व इंटरमंडी ई-ट्रेडची सुरुवात करण्यात आली असल्याची माहिती कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांनी दिली.

ई-नाम अंतर्गत या बाजार समित्यांमध्ये १ हजार ९९४ कोटी रुपये किंमतीच्या एकूण ५१३ लाख क्विंटल शेतमालाची ई-लिलावाद्वारे विक्री झाली आहे. बाजार समिती अंतर्गत ई-लिलावाद्वारे व्यवहार (इंट्रामंडी), राज्याअंतर्गत दोन बाजार समित्यांमध्ये ई-लिलावाद्वारे व्यवहार (इंटरमंडी) आणि दोन राज्यातील बाजार समित्यांमध्ये ई-लिलावाद्वारे व्यवहार (इंटरस्टेट) अशा तीन स्तरामध्ये ई-नामची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

> शेतमालाच्या गुणवत्ता तपासणी अंतर्गत १२ लाख ९७ हजार लॉट्सची तपासणी केली आहे. ई-नाम अंतर्गत ३१० कोटी ५९ लाखाची रक्कम शेतकऱ्याच्या खात्यात ऑनलाइन अदा केली आहे. सद्यःस्थितीत ई-नाम अतंर्गत ई-पेमेंट करणारे महाराष्ट्र हे देशातील तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. ई-लिलावामुळे शेतकऱ्यांना रास्त भाव मिळण्यास मदत होणार आहे तसेच ई-पेमेंट सुविधेमुळे शेतकऱ्यांना रक्कम थेट खात्यात प्राप्त होत असल्याने अधिकाधिक शेतकऱ्यांनी ई-नामद्वारे व्यवहार करावा.
>
> **- दीपक शिंदे,** कार्यकारी संचालक, कृषी पणन मंडळ

देशातील १ हजार २६० बाजार समित्या ई-नामला जोडल्या असून राज्यातील ११८ बाजार समित्या ई-नामला जोडल्या आहेत. या बाजार समित्यांमध्ये पहिला स्तर पूर्ण झालेला असून आत्तापर्यंत ई-नामद्वारे सोयाबीन, हरभरा, मका, गहू, ज्वारी, हळद, तूर व उडीद या शेतमालाची प्रामुख्याने विक्री केली आहे. नोव्हेंबर २०२२ मध्ये ई-नाम अंतर्गत प्रथमच राज्यातील दोन बाजार समित्यांमध्ये (इंटरमंडी) शेतमालाचा ई-लिलावाद्वारे खरेदी-विक्री व्यवहार करून ई-नामची दुसऱ्या स्तरावरील अंमलबजावणी सुरू झाली.

या अंतर्गत राज्यातील सिंगल लायसन्सधारकांद्वारे इंटरमंडी व्यवहार सुरू केले आहेत. आतापर्यंत १ लाख ६७२ क्विंटल व ५४ कोटी ६१ लाख किंमतीचे इंटर मंडी व्यवहार झाले आहेत. यामध्ये तूर, चना, मका व सोयाबीन या शेतमालाचा समावेश आहे. अमरावती ॲग्रो फूड्स प्रा.लि., दयाल एनर्जी प्रा. लि., गुजरात अंबुजा एक्स्पोर्ट लि., नर्मदा सोलव्हेक्स प्रा.लि. या सिंगल लायसन्स धारकांचा यात प्रामुख्याने समावेश आहे.

ऑक्टोबर २०२२ मध्ये ई-नाम अंतर्गत प्रथमच दोन राज्यातील बाजार समित्यांमध्ये (इंटरस्टेट) शेतमालाचा ई-लिलावाद्वारे खरेदी-विक्री व्यवहार सुरु करीत ई-नामची तिसऱ्या स्तरावरील अंमलबजावणी सुरू झाली. बारामती कृषि उत्पन्न बाजार समितीने रेशीम संचालनालय, नागपूर यांच्या मान्यतेने मुख्य यार्ड येथे रेशीम कोश खरेदी विक्रीसाठी केंद्र सुरु केले आहे. या केंद्रामध्ये पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, उस्मानाबाद, अहमदनगर, बीड, परभणी, यवतमाळ येथून शेतकरी रेशीम कोश विक्रीसाठी आणतात.

### खात्रीशीर कोश विक्रीची व्यवस्था कार्यरत

ई-नामद्वारे इंटरस्टेट व्यवहार अंतर्गत रेशीम कोशसाठी देशातील पहिला ई-लिलाव बारामती बाजार समितीमध्ये यशस्वी पार पडला असून ई-नामद्वारे रेशीम कोशाची मोठ्या प्रमाणात केरळमधील व्यापाऱ्यांद्वारे खरेदी होत आहे. बारामती बाजार समितीमध्ये रेशीम कोश विक्री केंद्र सुरू झाल्यापासून शेतकऱ्यांचा चांगला फायदा झाला असून खात्रीशीर कोश विक्रीची व्यवस्था कार्यरत झाली आहे.

### केरळ, मध्यप्रदेश, झारखंड, गुजरात, राजस्थानात विक्री

नाशिक जिल्ह्यात कळवणमधील शेतीश्लोक शेतकरी उत्पादक संस्थेद्वारे देवळा या ई-नाम बाजार समितीमधून झारखंडच्या दिल्ली फ्रेश कंपनीला कांद्याची विक्री केली आहे. या खरेदी अंतर्गत खरेदीदारांनी ई-नामद्वारे रक्कम ऑनलाइन अदा केली आहे. सद्यःस्थितीत ई-नाम इंटर स्टेटद्वारे रेशीम कोश, कापूस, कांदा, मूग व ओवा या शेतमालाची एकूण ३५२ क्विंटल व ६७ लाख रुपये किंमतीची विक्री केरळ, मध्यप्रदेश, झारखंड, राजस्थान व गुजरात या राज्यात केली आहे.

# पणन मंडळाचा फळ, धान्य व मिलेट महोत्सव सुरू



**पुणे** : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या पुणे विभागाच्या वतीने या वर्षी प्रथमच दामोदर व्हिला, कोथरूड बस स्टँडच्या समोर फळ, धान्य व मिलेट महोत्सवाचे आयोजन केले असून सामाजिक कार्यकर्ते ॲड. शिरीष भुजबळ व पणन मंडळाचे उपसरव्यवस्थापक राजेंद्र महाजन यांच्या उपस्थितीत उद्घाटन करण्यात आले. हा महोत्सव ९ एप्रिलपर्यंत सुरू राहणार आहे. या महोत्सवामध्ये देवगड येथील हापूस आंब्याबरोबरच कलिंगड, टरबूज, संत्रा व द्राक्षे ही फळे; जुन्नरमधील हातसडीचा तांदूळ, कोल्हापूर येथील नाचणी व खपली गहू उपलब्ध आहे. तसेच विषमुक्त गूळ व निर्जलीकरण केलेल्या फळांची उत्पादने आहेत.

Punyanagari Dt. 07/04/2023


# अलिबाग कांदा, डहाणू चिकू, सिंधुदुर्ग काजू, कोकमला जी.आय. मानांकनाने कोकणात आर्थिक क्रांतीची चाहूल

रायगड : सुयोग आंग्रे

**रत्नागिरी हापूस, अलिबाग पांढरा कांदा, डहाणू घोलवड चिकू, सिंधुदुर्ग काजू, कोकम यांना केंद्र सरकारच्या भौगोलिक निर्देशांक (जी.आय.) नोंदणी कार्यालयाने जी.आय. मानांकन प्रदान केले आहे. जी.आय. नोंदीमुळे कोकणातील उत्पादनांची जगभरात निर्यात अधिक सुकर झाली आहे. आंबा, कांदा, काजू, कोकम आणि चिकूला परदेशात मागणी वाढली आहे. याबरोबरीने परदेशात मागणी असणाऱ्या ठाणे, बदलापूरमधील जांभळांना जी.आय. मानांकनाची प्रतीक्षा आहे. कोकणातील फळांना निर्यात जगभर करून कोट्यवधी रुपयांचे परकीय चलन देशाला मिळत आहे.**







पुढारी विशेष

कोकण बागायतीत जी.आय. उत्पादनांमध्ये आघाडीवर पोहोचला आहे. परंतु, अजून फार मोठा पल्ला गाठायचा बाकी आहे. कोकणात अशी खूप वैशिष्ट्यपूर्ण उत्पादने आहेत, की ज्यांना अजून जी.आय. मिळणे बाकी आहे. कोकणात फार मोठ्या प्रमाणावर जी.आय. नोंदणी होण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी अथक प्रयत्नांची आणि राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे. कोकणातील प्रत्येक जिल्ह्यामधून किमान पाच जी.आय. नोंदणीचे लक्ष्य ठेवले तरीसुद्धा ४० च्या वर जी.आय. नोंद होऊ शकतात. पण, आजमितीला कोकणात केवळ ५ च्या आसपास जी.आय. नोंदी झाल्या आहेत. कोकणातील वैशिष्ट्यपूर्ण उत्पादनांची जी.आय. नोंदणी करण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न व्हायला हवेत. त्यासाठी एक महा मोहीम हाती घेण्याची आवश्यकता आहे.

**जी.आय. मानांकनाने....**

एखाद्या पिकाची किंवा शेतीमालाची जी.आय. नोंदणी होणे म्हणजे त्यास कायदेशीर अधिष्ठान प्राप्त होणे होय. ते कोणा एका व्यक्तीच्या नावावर मिळत नाही; तर त्या पिकाचे, शेतीमालाचे उत्पादन घेणाऱ्या संबंधित शेतकरी समूहाला जी.आय. प्रदान केला जातो. त्या परिसरातील भूगोल, हवामान, परंपरा, संस्कृती, इतिहास, जुने संदर्भ आणि इतर अनेक वैशिष्ट्यपूर्ण बाबींचा विचार करून जी.आय. दिले जाते. त्याला जगभरात विशेष महत्त्व आहे. ते प्रगतीचा मूलमंत्र बनवले आहे. या नोंदणीमुळे कायदेशीर अधिकाराबरोबरच कोकणातील फळ पिकांचा उत्पादनाचा 'ब्रँड' ही तयार झाला. यामुळे उत्पादनांची बनावट नावाने विक्री, भेसळ यासारख्या प्रकारांना चाप बसला आहे.

महाराष्ट्रातील कोकण किनारपट्टीवरील वेंगुर्ला काजू, कोकम आणि आंब्याला जी.आय. मिळाले आहे. जमिनीची धूप थांबावी, म्हणून पोर्तुगीज लोकांनी गोव्यामध्ये सर्वप्रथम काजू लावला. परंतु, काजूच्या लागवडीसाठी उत्कृष्ट जमीन त्यांना महाराष्ट्रात मिळाली. त्या जमिनीतून 'क' जीवनसत्त्व मोठ्या प्रमाणात तयार करणारा वेंगुर्ला काजू निर्माण झाला. त्याला जी.आय. मिळाल्यामुळे तो जगमान्य झाला.

शारीरिक वजन नैसर्गिकरीत्या कमी करणारे हायड्रोऑक्साईड, सायट्रिक सिड हे घटक कोकणातील कोकममध्ये नैसर्गिकरीत्या आढळून आले आहेत. कोकमला जी.आय. मिळाल्याने त्यालाही भारतभर भरारी घेता आली. रत्नागिरी आणि देवगड हापूसला जीआय मानांकन मिळाल्याने हापूस आंबा जगभर पोहोचला आहे. अलिबागमधील औषधी असणारा पांढरा कांदादेखील जी.आय. मानांकन मिळवून बाजारपेठांमध्ये भाव खावू लागला आहे.

डहाणू घोलवड येथील चिकूने आपल्या गोडव्याने फळांच्या बाजारात जीआय मिळवून परदेशवारी करण्यास सुरुवात केली आहे.

केवळ ठाणे बदलापूर येथील जांभळाला जी.आय. मानांकनाची प्रतीक्षा लागली आहे. जी.आय. मानांकन मिळाले नसलेतरी जांभळाने आपल्या औषधी गुणतत्त्वाने बाजारात आपले स्थान अढळ केले आहे कोकणातील काजू, हापूस, कोकम, आंबा, कांदा आणि चिकू या फळांना जी.आय. मानांकन प्राप्त झाल्याने आता या फळांची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर कायदेशीर कारवाई करणे शक्य झाले आहे. एरवी कोकणातून या फळांची रोपे नेऊन कलम करून बागायत करणाऱ्या अन्य ठिकाणच्या बागायतदारांना ही ओळख मिळणार नाही. कारण काहीही झालेतरी कोकणातल्या खडकाळ जमिनीवर कमी पाण्यावर पिकणाऱ्या या फळांच्या चवीला अवीट असतो. त्याची तुलना अन्य प्रांतातील फळांबरोबर होऊच शकत नाही.

# आंतरराज्य व्यवहार शक्य

## 'ई नाम'मध्ये राज्यातील ११८ समित्या देशपातळीवर जोडल्या

म. टा. प्रतिनिधी, पुणे

केंद्र सरकारच्या 'ई-नाम' योजनेअंतर्गत देशातील बाजार समित्यांशी राज्यातील ११८ बाजार समित्या जोडण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता दोन राज्यातील बाजार समित्यांमध्ये 'ई- लिलावा'द्वारे व्यवहार (इंटरस्टेट) करता येणार आहे. त्याशिवाय बाजार समिती अंतर्गत 'ई लिलावा'द्वारे व्यवहार (इंट्रामंडी) आणि राज्यांतर्गत दोन बाजार समित्यांमध्ये 'ई लिलावा'द्वारे व्यवहार (इंटरमंडी) अशा तीन पद्धतीन 'ई नाम' योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या पद्धतीने शेतमालाला चांगला भाव मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

देशात बाजार समित्यांमध्ये ई नाम योजनेची अंमलबजावणी सुरू आहे. त्याअंतर्गत बाजार समित्यांमध्ये एक हजार ९९४ कोटी रुपये किंमतीच्या एकूण ५१३ लाख क्विंटल शेतमालाची ई-लिलावाद्वारे विक्री झाली आहे. बाजार समिती अंतर्गत ई-लिलावाद्वारे 'इंट्रामंडी', 'इंटरमंडी' आणि 'इंटरस्टेट' अशा तीन स्तरांमध्ये 'ई-नाम'ची अंमलबजावणी करण्यात येत आहे.


'ई-नाम'च्या अंमलबजावणीला फाटा

"ई-लिलावामुळे रास्त दर मिळेल. ई-पेमेंटमुळे रक्कम थेट खात्यात प्राप्त होत असून, अधिकाधिक शेतकऱ्यांनी ई-नामद्वारे व्यवहार करावा.

– दीपक शिंदे, कार्यकारी संचालक, कृषी पणन मंडळ

### 'ई-नाम' योजनेची वैशिष्ट्ये

- देशातील एक हजार २६० बाजार समित्या जोडल्या
- या बाजार समित्यांमध्ये पहिला स्तर पूर्ण झाला असून, आतापर्यंत सोयाबीन, हरभरा, मका, गहू, ज्वारी, हळद, तूर व उडीद यांची विक्री
- नोव्हेंबरमध्ये प्रथमच राज्यातील दोन बाजार समित्यांमध्ये (इंटरमंडी) शेतमालाच्या ई-लिलावाद्वारे दुसऱ्या स्तरावरील अंमलबजावणी सुरू
- या अंतर्गत राज्यातील एका परवानाधारद्वारे 'इंटरमंडी' व्यवहार सुरू झाले
- आतापर्यंत एक लाख ६७२ क्विंटल आणि ५४ कोटी ६१ लाख किंमतीचे 'इंटरमंडी' व्यवहार
- सद्यस्थितीत ई-नाम 'इंटरस्टेट'द्वारे रेशीम कोष, कापूस, कांदा, मूग व ओवा या शेतमालाची विक्री
- केरळ, मध्य प्रदेश, झारखंड, राजस्थान, गुजरात या राज्यात इंटरस्टेटद्वारे विक्री

### रेशीम कोष खरेदी केंद्र

गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये 'ई-नाम'अंतर्गत प्रथमच दोन राज्यातील बाजार समित्यांमध्ये शेतमालाचा ई-लिलावाद्वारे खरेदी-विक्री व्यवहार सुरू करण्यात आली. बारामती बाजार समितीने नागपूरच्या रेशीम संचालनालयाच्या मान्यतेने मुख्य यार्ड येथे रेशीम कोष खरेदी विक्रीसाठी केंद्र सुरू केले आहे. या केंद्रामध्ये पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, धाराशिव, नगर, बीड, परभणी, यवतमाळ येथून शेतकरी रेशीम कोष विक्रीसाठी आणतात. 'ई-नाम'द्वारे इंटरस्टेट व्यवहारांतर्गत रेशीम कोषांसाठी देशातील पहिला ई-लिलाव बारामती बाजार समितीमध्ये यशस्वी झाला.

### निवडणुकीत सोळा अर्ज बाद

**पुणे :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रशासकीय मंडळाच्या १८ जागांसाठी प्राप्त झालेल्या ३०१ उमेदवारी अर्जांपैकी १६ अर्ज विविध त्रुटींमुळे छाननीत बाद झाले आहेत. बुधवारी (पाच एप्रिल) या अर्जांची छाननी झाली. पुणे बाजार समितीची निवडणूक २८ एप्रिलला आहे. ३१० अर्ज निवडणूक अधिकाऱ्यांना प्राप्त झाले.

उमेदवारांना आता २० एप्रिलपर्यंत अर्ज मागे घेता येणार आहेत. २१ एप्रिल रोजी निवडणुकीचे अंतिम चित्र स्पष्ट होणार आहे. त्यानंतर उमेदवारांना चिन्हांचे वाटप होणार आहे.

Maha. Time Dt 07/04/2023

# ई नामद्वारे राज्यात इंटरस्टेट व इंटरमंडी ई ट्रेडची सुरुवात

**पुणे :** केंद्र सरकारच्या ई नाम योजनेतंर्गत देशातील बाजार समित्यांशी राज्यातील ११८ बाजार समित्या जोडल्या असून राज्यात इंटरस्टेट व इंटरमंडी ई ट्रेडची सुरूवात करण्यात आली आहे.

ई नामअंतर्गत या बाजार समित्यांमध्ये १ हजार ९९४ कोटी रूपये किंमतीच्या एकूण ५१३ लाख क्विंटल शेतमालाची ई-लिलावाद्वारे विक्री झाली आहे. बाजार समिती अंतर्गत ई लिलावाद्वारे व्यवहार राज्यांतर्गत दोन बाजार समित्यांमध्ये ई लिलावाद्वारे व्यवहार राज्यातंर्गत दोन बाजार समित्यांमध्ये ई लिलावाद्वारे व्यवहार अशा तीन स्तरांमध्ये ई नामची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

देशातील १ हजार २६० बाजार समित्या ई नामला जोडल्या असून, राज्यातील ११८ बाजार समित्या ई-नामला जोडल्या आहेत. या बाजार समित्यांमध्ये पहिला स्तर पूर्ण झाला असून, आतापर्यंत ई नामद्वारे सोयाबीन, हरभरा, मका, गहू, ज्वारी, हळद, तूर व उडिद या शेतमालाची प्रामुख्याने विक्री करण्यात आली आहे. नोव्हेंबर २०२२ मध्ये ई नाम अंतर्गत प्रथमच राज्यातील दोन बाजार समित्यांमध्ये शेतमालाचा ई लिलावाद्वारे खरेदी विक्री व्यवहार करून ई-नामची दुसऱ्या स्तरांवरील अंमलबजावणी सुरू झाली.

या अंतर्गत राज्यातील सिंगल लायसन्स धारकाद्वारे इंटरमंडी व्यवहार सुरू करण्यात आले आहेत. आतापर्यंत १ लाख ३७२ क्विटल व ५४ कोटी ६१ लाख किंमतीचे इंटर मंडी व्यवहार झाले आहेत. यामध्ये तूर, चना, मका व सोयाबीन या शेतमालाचा समावेश आहे.

Kesari Dt. 07/04/2023

# बाजार समितीच्या वार्षिक उत्पन्नात लक्षणीय वाढ

**पुणे** : कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वार्षिक उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली आहे. मागील वर्षीच्या म्हणजे २०२२ ते २०२३ या वर्षीच्या तुलनेत उत्पन्नात २१ टक्क्यांनी वाढ झाली आहे. मागील तीन वर्षांपासून उत्पन्नाच्या उद्दिष्टापेक्षा अधिकची वाढ झाली असल्याचे बाजार समिती प्रशासनाने सांगितले.

मागील पाच वर्षाची सरासरी बाजार फी सुमारे ४३ कोटी रुपये इतकी होती. मागील वर्षी फीचा आकडा सुमारे ५२ कोटीपर्यंत पोहचला होता. यावर्षी सुमारे ५३ कोटी इतकी फी वसूल झाली आहे. तसेच मागील ५ वर्षाचे सरासरी वार्षिक उत्पन्न सुमारे रुपये ६३ कोटी होते. ते गतवर्षी सुमारे ७६ कोटी रूपयापर्यंत गेले. आणि यावर्षी सुमारे ७८ कोटीपर्यंत वार्षिक उत्पन्न वाढले आहे.

वाढावा रक्कम सलग २ वर्षे सुमारे २३ कोटी इतकी आहे. पुणे कृषी उत्पन्न बाजार समिती इतका वाढावा महाराष्ट्रातील अन्य कोणत्याही बाजार समितीची नाही, तसेच ट्रक पार्किंगमध्ये नाल्यालगत सुमारे १८ गुंठ्यावर विस्तारित डाळिंब यार्ड आडत्यांच्या खर्चाने सुरू झाले असते, तर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वार्षिक उत्पन्नात सुमारे १ कोटीने वाढ होणार होती. मात्र या जागेचा वापर सुरुझाला नाही, तर खेड शिवापूरप्रमाणे ही जागा पण हातची जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उत्पन्नात सुमारे २१ टक्के वाढ अधिकारी, तसेच कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने झाली असल्याचेही प्रशासनातर्फे नमूद करण्यात आले.

Kesari Dt. 07/04/2023

दैनिक भास्कर

2023-04-06

अहमदनगर (3)

**दिव्य मराठी विशेष** • शासनाच्या कृषी पणन मंडळाच्या 'आंबा महोत्सवा'ला ग्राहकांचा जोरदार प्रतिसाद

# पुणे येथील महोत्सवात पहिल्या चारच दिवसांत ९ हजार डझन आंब्याची थेट विक्री; ६५ लाख रुपयांची उलाढाल

जयश्री बोकील | पुणे



आंबा उत्पादकांना कुठल्याही मध्यस्थाशिवाय आपले उत्पादन थेट ग्राहकापर्यंत नेण्यासाठी राज्य कृषी पणन मंडळाने सुरू केलेल्या आंबा महोत्सवाला सुरुवातीपासूनच ग्राहकांनी जोरदार प्रतिसाद दिला आहे. अवघ्या चार दिवसांत आंबा महोत्सवात ९ हजार डझन आंबा विकला गेला असून, ६५ लाखांची उलाढाल झाल्याचे चित्र समोर आले आहे. आंबा महोत्सव नुकताच (१ एप्रिल) सुरू झाला असून ३१ मेपर्यंत ग्राहकांना उत्पादकांकडून थेट खरेदी करता येणार आहे.

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत आयोजित या आंबा महोत्सवाची माहिती दिवसेंदिवस अधिकाधिक आंबा उत्पादकांपर्यंत पोहोचत आहे. 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' या योजनेअंतर्गत पुण्यात गुलटेकडी, मार्केट यार्ड येथे आंबा महोत्सवाचे आयोजन २००२ पासून करण्यात येत आहे. विक्रीच्या मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगला आंबा मिळावा, या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात येते.

### आंबा महोत्सवाचे वेगळेपण आहे असे

सलग दोन महिने सुरू राहणारा राज्यातील एकमेव महोत्सव असून एकच उत्पादन (कमोडिटी) विकले जाते, असा हा एकमेव महोत्सव आहे. कोकणातील १०५ आंबा उत्पादकांचा यामध्ये सहभाग आहे. या महोत्सवात उत्तम प्रतीचा आंबा खरेदी करण्याची संधी उपलब्ध आहे. उत्पादक आणि ग्राहक यामध्ये थेट सेवा, कुठलाही मध्यस्थ नाही. आंबा उत्पादकांमध्ये ज्येष्ठांसह युवा उत्पादकांचाही समावेश आहे. कोकणातील आंब्यांचे वैविध्य चाखण्याची संधी या निमित्ताने मिळणार आहे.

# काजू फळपीक विकास योजनेमुळे शेतकऱ्यांना फायदा

- १ हजार ३२५ कोटी रुपयांची आर्थिक तरतूद
- पणन मंडळाचे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांची माहिती



## गोदामांपासून प्रक्रिया केंद्रास अर्थसाहाय्य

योजनेत पाच हजार टन क्षमतेचे गोदाम, काजू बोंड रसावरील सामायिक प्रक्रिया केंद्र उभारणी, कोकणातील जी.आय. ब्रॅण्ड विकसित करणे, जिल्हास्तरावर काजू प्रक्रियेकरिता आधुनिक मध्यवर्ती सुविधा केंद्र उभारणे, ओले काजू गर काढणे व प्रक्रियेकरिता उभारण्यात येणाऱ्या प्रक्रिया केंद्राला अर्थसहाय्य करण्यावर आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यात काजू उत्पादन वाढीसाठी काजू फळपीक विकास योजना २०२२-२३ या आर्थिक वर्षापासून पुढील पाच वर्षांसाठी राबविण्यात येणार आहे. त्यासाठी सुमारे १ हजार ३२५ कोटी रुपयांची आर्थिक तरतूद राज्य सरकारने केली आहे. ज्यामुळे काजू लागवड, प्रक्रिया आणि विक्रीस चालना मिळून शेतकऱ्यांना फायदा होणार असल्याची माहिती राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांनी दिली.

कृषी, सहकार आणि पणन विभागाच्या संयुक्त विद्यमाने ही योजना प्रामुख्याने कोकणातील जिल्हे आणि कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड व आजरा या तालुक्यात राबविण्यात येणार आहे. राज्याच्या अर्थसंकल्पात २०० कोटी रुपयांच्या भागभांडवलासह कोकणातील काजू बोर्डाची घोषणा करण्यात आली आहे. ज्याद्वारे कोकणात काजू बोंड प्रक्रिया केंद्रे स्थापन करण्यात येणार आहेत.

योजनेत काजू लागवड, उत्पादन वाढ, प्रक्रिया उद्योग उभारणीविषयक तसेच चालू असणाऱ्या प्रक्रिया उद्योगांना आर्थिक साहाय्य करण्याविषयी धोरणात्मक शिफारशींचा समावेश आहे. शासनाच्या निर्णयानुसार काजू फळपीक विकास योजना समितीने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन आंबा-काजू बोर्डाची स्थापना पणन विभागाने करण्याबाबत मान्यता देण्यात आलेली आहे.

काजू प्रक्रिया उद्योगांना वर्षभर काजू बी पुरवठा करण्याकरिता पणन मंडळामार्फत बी खरेदी करून प्रक्रिया उद्योगांना पुरवठा करण्याकरिता भागभांडवल उपलब्ध करून देण्यात येणार आहे. काजू फळ विकास योजनेमुळे काजू उत्पादक शेतकरी, रोपवाटिकाधारक कृषी विद्यापीठ, प्रक्रिया उद्योजक या घटकांना फायदा होणार आहे.

Pudhari Dt. 05/04/2023

# कोथरूड येथे धान्य महोत्सव

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** पणन मंडळाच्या पुणे विभागाच्या वतीने 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' अंतर्गत यावर्षी प्रथमच फळ, धान्य व मिलेट महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव दामोदर व्हिला, कोथरूड बसस्टँड समोरील पटांगणात ५ ते ९ एप्रिल दरम्यान भरणार आहे. यात द्राक्ष, डाळिंब, अंजीर, आंबा व भरडधान्य उत्पादक शेतकऱ्यांना आपल्या दर्जेदार उत्पादनांची थेट ग्राहकांना विक्री करण्याची संधी मिळणार आहे.

सुटीच्या दिवसात या महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्यामुळे कोथरूड मधील ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा आहे. ग्राहकांनी या महोत्सवाचा लाभ घ्यावा व शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन पणन मंडळाचे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांनी व पुणे विभागीय उपसरव्यवस्थापक राजेंद्र महाजन यांनी केले आहे.

Lokmat Dt. 05/04/2023

# उत्पादक ते ग्राहक थेट विक्री योजनेंतर्गत बुधवारपासून फळ व धान्य महोत्सव

**पुणे** : महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाच्या पुणे विभागाच्या वतीने उत्पादक ते ग्राहक थेट विक्री अंतर्गत यावर्षी प्रथमच फळ, धान्य व मिलेट महोत्सव-२०२३ चे दामोदर व्हिला, कोथरूड बस स्टँडच्या समोरील पटांगणामध्ये ५ ते ९ एप्रिल २०२३ दरम्यान आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून द्राक्ष, डाळींब, अंजीर, आंबा व भरडधान्य उत्पादक शेतकऱ्यांना थेट ग्राहकांना आपल्या दर्जेदार उत्पादनांची विक्री करण्याची संधी मिळणार आहे. सुटीच्या दिवसात या महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्यामुळे कोथरूडमधील ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळण्याची अपेक्षा आहे. ग्राहकांनी या महोत्सवाचा लाभ घ्यावा व शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन पणन मंडळाचे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांनी व पुणे विभागीय उपसरव्यवस्थापक राजेंद्र महाजन यांनी केले आहे.

Punyanagari Dt. 04/04/2023

# कोथरुडमध्ये भरड धान्य महोत्सव

**पुणे :** उत्पादक ते ग्राहक थेट विक्री, या पणन मंडळाच्या योजनेनुसार कोथरुड बसस्थानकासमोरील मोकळ्या जागेत फळे व धान्य, भरड धान्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव ५ ते ९ एप्रिल या काळात सुरू राहणार आहे.

सुटीच्या दिवसांत जास्तीत-जास्त ग्राहकांनी लाभ घ्यावा, यासाठी पणन मंडळाने कोथरुड बसस्थानकासमोरील मोकळ्या जागेत या महोत्सवाचे आयोजन केले आहे. उत्पादक शेतकऱ्यांना या महोत्सवाच्या माध्यमातून ग्राहकांना दर्जेदार उत्पादनांची विक्री करण्याची आणि ग्राहकांना दर्जेदार शेतीमाल खरेदीची संधी मिळणार आहे, अशी माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांनी दिली.

Loksatta Dt. 04/04/2023

# कांदा अनुदानाच्या नोंदणीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**मंचर, जि. पुणे :** मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने कांदा अनुदानासाठी शेतकऱ्यांची धावपळ सुरू आहे. त्यासाठी २० एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली असली, तरी शेतकऱ्यांनी योग्य कागदपत्रे बाजार समिती कार्यालयात सादर करावीत, असे आवाहन प्रशासक पी. एस. रोकडे यांनी केले.



१ फेब्रुवारी ते शुक्रवार (ता. ३१ मार्च) या कालावधीत कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना ३५० रुपये प्रतिक्विंटल आणि जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रति शेतकरी याप्रमाणे सरकारमार्फत अनुदान देण्यात येणार आहे. त्यासाठी आवश्यक असणारी कागदपत्रे पुढीलप्रमाणे विक्री केलेल्या कांदा विक्रीची मूळपट्टी, कांदा पिकाची नोंद असलेला सातबारा उतारा, बँक पासबुकाची पहिल्या पानाची, आधार कार्डची झेरॉक्स प्रत. ज्या प्रकरणात सातबारा वडिलांच्या नावे आणि विक्री पट्टी मुलाच्या अथवा अन्य कुटुंबीयांच्या नावे आहे अशा प्रकरणांमध्ये सहमती असणारे शपथ पत्र आदी कागदपत्रांसह आवश्यक त्या नमुन्यात २० एप्रिल पर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन सचिव सचिन बोऱ्हाडे यांनी केले.

**“ कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातच ज्या शेतकऱ्यांनी कांदा विक्री केली आहे तेच शेतकरी कांदा अनुदानासाठी पात्र राहतील. ज्या शेतकऱ्यांनी शेतात कांदा विक्री व्यापाऱ्यांना केली असेल त्यांना अनुदान मिळणार नाही. अनुदान मिळण्यासाठी कांदा विक्रीची मुदत वीस एप्रिल अशी आहे.**

**– पी. एस. रोकडे,** प्रशासक, कृषी उत्पन्न बाजार समिती, मंचर

Agrowon Dt. 03/04/2023

# मार्केटयार्डात आंबा महोत्सव झाला सुरू

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा आंबा मिळावा या उद्देशाने महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' या आंबा महोत्सवाची शनिवारपासून सुरुवात करण्यात आली.

गुलटेकडी, मार्केटयार्डातील पीएमटी बस डेपो येथील मोकळी जागा येथून आंबा महोत्सव सुरू असून, या महोत्सवात ७० स्टॉल उत्पादकांना उपलब्ध करून देण्यात आले आहेत. ग्राहकांना हापूस, केशर, पायरी आंबा तसेच बचत गटांची उत्पादने खरेदीची संधी लाभणार आहे. हा महोत्सव १ एप्रिलपासून ३१ मेपर्यंत सुरू राहणार आहे. कोकणातील उच्च प्रतीच्या हापूस आंब्याचा लाभ ग्राहकांनी घेण्याचे आवाहन कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांनी केले आहे.

Lokmat Dt. 02/04/2023



पुणे : पणन मंडळाच्या आंबा महोत्सवामध्ये सहभागी झालेले आंबा उत्पादक शेतकरी.

# आंबा महोत्सवाला सुरुवात

## कृषी पणन मंडळातर्फे मार्केट यार्ड येथे विक्री सुरू

**पुणे :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे व पुणे जिल्हा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' योजनेअंतर्गत 'आंबा महोत्सव २०२३' ला शनिवारपासून (ता.१) प्रारंभ झाला. गुलटेकडी मार्केट यार्ड येथील पीएमटी बस डेपो शेजारील जिल्हा परिषदेच्या मोकळ्या जागेत महोत्सवाचे आयोजन केले आहे.

कृषी पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री'अंतर्गत गुलटेकडी मार्केट यार्ड येथे आंबा महोत्सवाचे आयोजन २००२ पासून करण्यात येत आहे. विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा आंबा मिळावा या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असल्याचे पणन मंडळाचे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांनी सांगितले.

या वर्षी महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यांतील, तसेच राज्यातील केशर आंबा उत्पादकांबरोबरच जिल्हा परिषदेकडील ग्रामीण विकास यंत्रणा विभागाकडील काही महिला बचत गटांचाही सामावेश आला आहे. आंबा उत्पादकांची नोंदणी प्रक्रिया पणन मंडळाच्या विभागीय कार्यालयाकडे करण्यात आल्यानंतर त्यांना स्टॉलवाटप करण्यात आले आहे. या वर्षी सुमारे १०५ उत्पादकांनी विभागीय कार्यालयाकडे नोंदणी केलेली आहे. हा महोत्सव ग्राहकांच्या सोयीसाठी आयोजित करण्यात येत असून, सुमारे ७० स्टॉल उत्पादकांना उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

Agrowon Dt. 02/04/2023

# मार्केट यार्डात आजपासून आंबा महोत्सव

**मार्केट यार्ड, ता. ३१ :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' योजनेंतर्गत आंबा महोत्सवाचे आयोजन केले जाते. यावर्षीही गुलटेकडी, मार्केट यार्डातील पीएमटी बस डेपो शेजारील जिल्हा परिषदेच्या मोकळ्या जागेत शनिवारपासून (ता. १) सुरू करण्यात येणार आहे.

विक्री व्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा आंबा मिळावा या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन दरवर्षी करण्यात येते. यंदा महोत्सवात ७० स्टॉल उत्पादकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. ग्राहकांना हापूस, केशर, पायरी आंबा तसेच बचत गटांची विविध प्रक्रियायुक्त उत्पादने खरेदीची संधी लाभणार आहे. हा महोत्सव एक एप्रिलला सुरू होऊन साधारणतः ३१ मेपर्यंत सुरू राहणार आहे. कोकणातील उच्च प्रतीच्या हापूस आंब्याचा लाभ ग्राहकांनी घेण्याचे आवाहन कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांनी केले आहे.

“ चालू वर्षी आंबा महोत्सवाचे आयोजन महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे आणि जिल्हा परिषद यांचे संयुक्त विद्यमाने करण्यात येत आहे. महोत्सवामध्ये रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यातील तसेच राज्यातील केशर आंबा उत्पादकांबरोबरच जिल्हा परिषदेकडील ग्रामिण विकास यंत्रणा विभागाकडील काही महिला बचत गटांचाही सामावेश असणार आहे.

**- दीपक शिंदे,** कार्यकारी संचालक, राज्य कृषी पणन मंडळ

Sakal Dt. 01/04/2023

# 'आंबा महोत्सव २०२३' ला आजपासून सुरुवात

**पुणे** : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळामार्फत दरवर्षी 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' योजने अंतर्गत पुण्याच्या गुलटेकडी मार्केटयार्डात आंबा महोत्सवाचे आयोजन सन २००२ पासून करण्यात येत आहे. यावर्षीच्या आंबा महोत्सवाला आज शनिवार (दि.१ एप्रिल) पासून सुरुवात होत आहे. कोकणातील उच्च प्रतिच्या हापूस आंब्याचा लाभ ग्राहकांनी घ्यावा, असे आवाहन कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांनी केले. कोविडची २ वर्षे वगळता कृषी पणन मंडळामार्फत दरवर्षी आंबा महोत्सवाचे आयोजन केले आहे. विक्री व्यवस्थेतील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतकऱ्यांना योग्य बाजारभाव व ग्राहकांना रास्त दरात चांगल्या गुणवत्तेचा आंबा मिळावा, या उद्देशाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. चालू वर्षी 'आंबा महोत्सव २०२३'चे आयोजन महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, पुणे व पुणे जिल्हा परिषद, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने करण्यात येणार आहे. महोत्सवात रत्नागिरी, सिंधुदुर्ग व रायगड जिल्ह्यातील तसेच राज्यातील केशर आंबा उत्पादकांबरोबरच जिल्हा परिषदेकडील ग्रामिण विकास यंत्रणा विभागाकडील काही महिला बचत गटांचाही समावेश असणार आहे. चालू वर्षी सुमारे १०५ उत्पादकांनी विभागीय कार्यालयाकडे नोंदणी केलेली आहे. या उत्पादकांमार्फत उत्तम प्रतिचा आंबा ग्राहकांना उपलब्ध होणार आहे. सदरील महोत्सव हा ग्राहकांच्या सोयीसाठी गुलटेकडी मार्केटयार्डातील पीएमटी बस डेपो शेजारील जिल्हा परिषदेच्या मोकळ्या जागेत सुरू करण्यात येणार आहे. यावेळेस सुमारे ७० स्टॉल उत्पादकांना उपलब्ध करून देण्यात येणार असल्याने ग्राहकांना हापूस, केशर, पायरी आंबा तसेच बचत गटांची विविध प्रक्रियायुक्त उत्पादने खरेदीची संधी लाभणार आहे.

**❑ सुमारे ७० स्टॉल उत्पादकांना उपलब्ध : हापूस, केशर, पायरी आंबा तसेच बचत गटांची उत्पादने खरेदीची संधी**

Punyanagari Dt. 01/04/2023

# 'पणन'चा आजपासून आंबा महोत्सव

**पुणे :** राज्य कृषी पणन मंडळ आणि पुणे जिल्हा परिषदेच्या संयुक्त विद्यमाने यंदाच्या 'उत्पादक ते ग्राहक थेट विक्री' योजनेंतर्गत आंबा महोत्सवास शनिवारपासून (दि. १) सुरुवात होत आहे. सुमारे ७० स्टॉलवर कोकणातील दर्जेदार हापूस आंब्यांसह केशर, पायरी आंबा आणि बचतगटांची विविध प्रक्रियायुक्त उत्पादने खरेदीची संधी ग्राहकांना देण्यात येत असल्याची माहिती पणन मंडळाचे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांनी दिली.

मार्केट यार्डातील पीएमटीशेजारील जिल्हा परिषदेच्या मोकळ्या जागेत आंबा महोत्सव होत असून, तो १ एप्रिल ते ३१ मे या कालावधीत सुरू राहील. ते म्हणाले, कोव्हिडची २ वर्षे वगळता, पणन मंडळामार्फत दरवर्षी आंबा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. विक्रीव्यवस्थेमधील मध्यस्थांची संख्या कमी करून शेतक-

Pudhari Dt. 01/04/2023

# कांदा अनुदानासाठी २० एप्रिलची मुदत

## राज्यात विकलेल्या कांद्यालाच अनुदान

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** गेल्या महिन्यात कांद्याने वांदा केल्यानंतर शेतकऱ्यांच्या उसळलेल्या आंगडोंबाला शांत करण्यासाठी राज्य सरकारने ३५० रुपये प्रतिक्विंटल अनुदान जाहीर केले होते. त्यासाठी आता कांदा उत्पादक शेतकऱ्यांना ३ ते २० एप्रिलदरम्यान अर्ज करायचे आहेत. १ फेब्रुवारी ते ३१ मार्चदरम्यान बाजार समिती, खासगी बाजार तसेच नाफेडकडे विक्री करणाऱ्या उत्पादकांना याचा लाभ मिळणार आहे. तर परराज्यातून आवक झालेल्या व व्यापाऱ्यांच्या कांद्यासाठी ही योजना लागू नाही, अशी माहिती स्पष्टीकरण पणन संचालक विनायक कोकरे यांनी दिली.

राज्यात यंदाच्या पावसाळ्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे कांद्याचे बहुतांशी पीक वाया गेले होते. त्यामुळे शेतकऱ्यांनी लेट खरीप कांद्याची लागवड केली होती. हे पीक डिसेंबरअखेरीस काढणीला येणे अपेक्षित होते. त्यामुळे जानेवारीनंतर बाजारात कांद्याची मोठी आवक बाजारात झाली. परिणामी, फेब्रुवारीमध्ये कांद्याच्या दरात घसरण झाली. उत्पादन खर्च तर सोडाच; पण काढलेला कांदा बाजार समितीत वाहून नेण्यासाठी येणारा खर्च निघत नव्हता. अनेक शेतकऱ्यांना तर खिशातून हा खर्च करावा लागला. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला. राज्यातील सर्वच बाजार समित्यांमध्ये कांद्याचे दर घसरल्याने शेतकरी आक्रमक झाले. त्यातून रास्ता रोको व आंदोलनही झाले. कांद्यामुळे आणखी वांदा होऊ नये यासाठी राज्य सरकारने सुरुवातीला ३०० रुपये प्रतिक्विंटल अनुदान जाहीर केले. विधिमंडळ अधिवेशनात हा मुद्दा चांगलाच गाजल्याने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यात आणखी ५० रुपयांची वाढ करत अनुदान ३५० रुपये प्रतिक्विंटल असे केले.



- कृषी उत्पन्न बाजार समित्या, खासगी बाजार समित्या, थेट पणन परवानाधारक तसेच नाफेडकडे एक फेब्रुवारी ते ३१ मार्च या कालावधी कांदा विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल ३५० रुपये आणि जास्तीत जास्त दोनशे क्विंटल प्रतिशेतकरी याप्रमाणे अनुदान मंजूर करण्याचा निर्णय सरकारने घेतला. त्यासाठी अटी घालण्यात आल्या आहेत.
- त्यानुसार परराज्यातून आवक झालेल्या व व्यापाऱ्यांच्या कांद्यासाठी ही योजना लागू नाही. हे अनुदान थेट शेतकऱ्यांच्या बँकेत जमा होणार असून, अनुदान मिळण्यासाठी कांदा विक्री पट्टी किंवा विक्री पावती, सात बारा उतारा, बँकेचे खाते क्रमांकासह बाजार समितीकडे अर्ज करावा लागणार आहे.
- यासाठी बाजार समितीने प्रस्ताव तयार करावे लागणार आहेत. हा प्रस्ताव तालुका सहायक निबंधकांनी तपासून जिल्हा निबंधकांकडे सादर करून पणन संचालकांनी जिल्हानिहाय लाभार्थ्यांची यादी तयार करून ३० दिवसांत पाठवावी लागणार आहे. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.
- योजनेच्या अंमलबजावणीसाठी बाजार समितीचे सचिव, जिल्हा उपनिबंधक हे लाभार्थी अंतिम करण्यासाठी नियंत्रक म्हणून काम पाहतील.

Lokmat Dt. 01/04/2023

# डाळिंब क्षेत्र वाढविण्यासाठी शासनामार्फत विविध उपक्रम राबविण्यासाठी प्रयत्नशील : अनुप कुमार



**दैनिक लोक सह्याद्री**

सोलापूर/प्रतिनिधी: सोलापूर जिल्हा हा डाळिंब पिकाचे आगार असणारा जिल्हा आहे. भारतातून डाळिंब निर्यातीत या जिल्ह्याचा मोलाचा वाटा आहे. परंतु काही वर्षापासून प्रतिकूल नैसर्गिक बदलांमुळे, रोग व कीड प्रादुर्भावामुळे, तसेच निश्चित भाव नसल्याने डाळिंब लागवड कमी झाली आहे. या अनुषंगाने डाळिंब पीक उत्पादकांच्या अडचणी सोडवण्यासाठी डाळिंब पीक धोरण कार्यशाळा उपयोगी ठरेल. डाळिंबाचे कमी झालेले क्षेत्र वाढविण्यासाठी शासनामार्फत विविध उपक्रम राबविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही राज्याचे सहकार व पणन विभागाचे अप्पर मुख्य सचिव तथा तथा मॅग्रेट सोसायटीचे अध्यक्ष अनुप कुमार यांनी व्यक्त केला.

डाळिंब पिकाची लागवड वाढण्यासाठी महाराष्ट्र अॅग्रीबिझिनेस नेटवर्क (मॅग्रेट) प्रकल्पाच्या क्षमता विकास घटकांतर्गत आयोजित डाळिंब पीक धोरण कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. शिवछत्रपती रंगभवन सभागृह येथे आयोजित या कार्यक्रमास मॅग्रेट प्रकल्पाचे अतिरीक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव, विभागीय प्रकल्प उपसंचालक राजेंद्र महाजन, प्रकल्प उपसंचालक नितीन पाटील, जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र ग्रो बिझनेस नेटवर्क (मॅग्रेट) प्रकल्प व फार्म डी एस एस अॅग्रोटेक प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेत राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूरचे संचालक राजीव मराठे यांनी डाळिंब लागवडीचे क्षेत्र कमी झाल्याची कारणे व लागवडीचे क्षेत्र वाढण्यासाठी काय प्रयत्न करणे आवश्यक आहे याबाबत मार्गदर्शन केले. तांत्रिक मार्गदर्शनामध्ये फार्म डी एस एस अॅग्रीटेक प्रा. लि. चे संस्थापक डाळिंबरत्न बी. टी. गोरे यांनी उत्तम कृषि पध्दती वापरून डाळिंबाच्या शेती आधुनिक कशी करता येईल, यासंदर्भात मार्गदर्शन केले. राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूरच्या प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. जोत्स्ना शर्मा यांनी डाळिंब पीक संरक्षण, डाळिंबावरील विविध रोग व त्यावरील उपाययोजना याबाबत मार्गदर्शन केले. राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूरचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. निलेश गायकवाड यांनी काढणीपश्चात व्यवस्थापन व डाळिंबाचे मूल्यवर्धन करण्यासाठी फळ प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन केले. पंढरपूर भागातील निर्यातदार अमरजीत जगताप यांनी विपणन व निर्यात कशी करावी, तसेच निर्यात करताना येणाऱ्या अडचणी व त्यावर करावयाच्या उपाययोजना या विषयावर मार्गदर्शन केले. तांत्रिक मार्गदर्शनानंतर शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरूवात दीप प्रज्वलनाने झाली. प्रास्ताविक मॅग्रेट प्रकल्पाचे प्रकल्प संचालक तथा महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांनी केले. या कार्यशाळेत मान्यवरांच्या हस्ते डाळिंब माहिती पुस्तिकेचे प्रकाशनही करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्ह्यातील विविध भागातून ५०० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी तसेच महिला डाळिंब उत्पादकांनी उपस्थिती दर्शविली.

April 2023

# डाळिंब क्षेत्र वाढविण्यासाठी शासनामार्फत विविध उपक्रम राबविण्यासाठी प्रयत्नशील - सहकार अप्पर मुख्य सचिव अनुप कुमार

## डाळिंब पीक धोरण कार्यशाळा उत्साहात



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा हा डाळिंब पिकाचे आगार असणारा जिल्हा आहे. भारतातून डाळिंब नियार्तीत या जिल्ह्याचा मोलाचा वाटा आहे. परंतु काही वर्षापासून प्रतिकूल नैसर्गिक बदलांमुळे, रोग व कीड प्रादुभार्वामुळे, तसेच निश्चित भाव नसल्याने डाळिंब लागवड कमी झाली आहे. या अनुषंगाने डाळिंब पीक उत्पादकांच्या अडचणी सोडवण्यासाठी डाळिंब पीक धोरण कार्यशाळा उपयोगी ठरेल. डाळिंबाचे कमी झालेले क्षेत्र वाढविण्यासाठी शासनामार्फत विविध उपक्रम राबविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही राज्याचे सहकार व पणन विभागाचे अप्पर मुख्य सचिव तथा तथा मॅग्नेट सोसायटीचे अध्यक्ष अनुप कुमार यांनी व्यक्त केला.

डाळिंब पिकाची लागवड वाढण्यासाठी महाराष्ट्र ॲग्रीबिझिनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्पाच्या क्षमता विकास घटकांतर्गत आयोजित डाळिंब पीक धोरण कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. शिवछत्रपती रंगभवन सभागृह येथे आयोजित या कार्यक्रमास मॅग्नेट प्रकल्पाचे अतिरीक्त प्रकल्प संचालक डॉ. अमोल यादव, विभागीय प्रकल्प उपसंचालक राजेंद्र महाजन, प्रकल्प उपसंचालक नितीन पाटील, जिल्हा उपनिबंधक किरण गायकवाड आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित महाराष्ट्र ॲग्रो बिझनेस नेटवर्क (मॅग्नेट) प्रकल्प व फार्म डी एस एस ॲग्रोटेक प्रा. लि. यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेत राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूरचे संचालक राजीव मराठे यांनी डाळिंब लागवडीचे क्षेत्र कमी झाल्याची कारणे व लागवडीचे क्षेत्र वाढण्यासाठी काय प्रयत्न करणे आवश्यक आहे याबाबत मार्गदर्शन केले. तांत्रिक मार्गदर्शनामध्ये फार्म डी एस एस ॲग्रीटेक प्रा. लि. चे संस्थापक डाळिंबरत्न बी. टी. गोरे यांनी उत्तम कृषि पध्दती वापरून डाळिंबाच्या शेती आधुनिक कशी करता येईल, यासंदर्भात मार्गदर्शन केले. राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूरच्या प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. जोत्स्ना शर्मा यांनी डाळिंब पीक संरक्षण, डाळिंबावरील विविध रोग व त्यावरील उपाययोजना याबाबत मार्गदर्शन केले. राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र, सोलापूरचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. निलेश गायकवाड यांनी काढणीपश्चात व्यवस्थापन व डाळिंबाचे मूल्यवर्धन करण्यासाठी फळ प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन केले. पंढरपूर भागातील निर्यातदार अमरजीत जगताप यांनी विपणन व निर्यात कशी करावी, तसेच निर्यात करताना येणाऱ्या अडचणी व त्यावर करावयाच्या उपाययोजना या विषयावर मार्गदर्शन केले. तांत्रिक मार्गदर्शनानंतर शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

प्रशिक्षण कार्यक्रमाची सुरूवात दीप प्रज्वलनाने झाली. प्रास्ताविक मॅग्नेट प्रकल्पाचे प्रकल्प संचालक तथा महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक दीपक शिंदे यांनी केले. या कार्यशाळेत मान्यवरांच्या हस्ते डाळिंब माहिती पुस्तिकेचे प्रकाशनही करण्यात आले. या कार्यक्रमास जिल्ह्यातील विविध भागातून ५०० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी तसेच महिला डाळिंब उत्पादकांनी उपस्थिती दर्शविली.

April 2023